PDF.js viewer

25/05/2026, 20:45
CBED-43011/4/2026-O/O SUPT-STATE EXCBEED

I/2387370/202

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी (राज्य उत्पादन शुल्क), बीड यांचे कार्यालय
पत्ता-चांदमारी क्वाटर्स, पालवण चौक, धानोरा रोड, बीड
Email- stateexcisebeed@gmail.com Tel- ०२२४२-२२२५०३

वाचले :-

१. मा.अपर जिल्हादंडाधिकारी, बीड यांचे पत्र क्र. २०२६/गृह विभाग/अनुज्ञप्त्या बंद ठेवणे/बकरी ईद, दि. १५/०५/२०२६
२. मा.पोलीस अधीक्षक, बीड यांचे पत्र क्र. जिवीशा/सण-उत्सव/बकरी ईद/देशी वदेशी दारु दुकाने, अनु.बंद/२०२६-२३१२, दि. १३/०५/२०२६

****

आदेश

क्रमांक : सीएल/एफएलआर ११२०२६/अधी

बीड, दिनांक स्वाक्षरीप्रमाणे

ज्या अर्थी, मा. पोलीस अधीक्षक, बीड यांचे उपरोक्त नमुद पत्रान्वये दि. २८/०५/२०२६ रोजी बकरी ईद शहरी व ग्रामीण भागात साजरी होणार आहे. सदर ईदच्या दिवशी मुस्लीम बांधव मस्जिद, दर्गाह, इदगाह, इत्यादी ठिकाणी जाऊन नमाज अदा करतात. सदर काळामध्ये दारु (मद्य) सेवन करुन इतर समाजाचे लोकांकडून नशेमध्ये किरकोळ घटना घडल्यास नमाजाचे दरम्यान व्यत्यय निर्माण होतो. एखाद्या वेळी जातीय स्वरुपाची घटना घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याकरीता दक्षता घेणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, मी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, बीड महाराष्ट्र मद्य निषेध कायदा १९४९ चे कलम १४२ (१) अन्वये प्रदान अधिकाराचा वापर करुन बीड जिल्ह्यातील सर्व मद्य विक्री करणाऱ्या अबकारी अनुज्ञप्त्या (एफएल-१, एफएल-२, एफएल-३, एफएलबिआर-२, सीएल-२, सीएल-३ व ताडी अनुज्ञप्ती इ.) बंद ठेवण्याचे याव्दारे आदेश पारीत करीत आहे.

अ. क्र.	अनुज्ञप्ती बंद ठेवण्याचा दिवस	मद्यविक्रीच्या अनुज्ञप्ती बंदचे क्षेत्र	तपशिल
१	दि.२८/०५/२०२६ (संपुर्ण दिवस)	संपूर्ण जिल्हा	बकरी ईद असल्याने

उपरोक्त नमुद केलेल्या दिवशी सर्व उल्लेखित अनुज्ञप्ती बंद ठेवण्याच्या असून त्याबाबत नुकसान भरपाई दिली जाणार नाही. तसेच सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकां विरुध्द महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम १९४९ व त्या अंतर्गत असलेल्या नियमांतर्गत तरतुंदीनुसार कडक कारवाई केली जाईल, याची नोंद घ्यावी.

Digitally signed by
VIVEK JOHNSON
Date: 21-05-2026
22:33:15

(विवेक जॉन्सन, भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
बीड जि. बीड